वाचा- १.वाळू घाट लिलाव सन २०२०-२१ मध्ये ग्रामसभेची शिफारस असलेल्या ग्रामपंचायतीस दयावयाच्या निधी करिता आयोजित बैठकीचे इतिवृत्तांत दिं ०५/०७/२०२१.
२.या कार्यालयाचे पत्र क्र जिपजा/पं-४/गौणख/कावि-२१९१/२०२१ दिनांक २२/०७/२०२१.
३.गविअ यांचेकडील प्राप्त प्रस्ताव
४.या कार्यालयाचे पत्र क्र जिपजा/पं-४/गौणख/कावि-५७८/२०२२, ११६१/२०२२ व १६२४/२०२२दिनांक २१/०२/२०२२, ३०/०३/२०२२व ४/५/२०२२
५.वाळू घाट लिलाव सन २०२०-२१ मध्ये ग्रामसभेची शिफारस असलेल्या ग्रामपंचायतीस दयावयाच्या निधी करिता आयोजित बैठकीचे इतिवृत्तांत दिं ०४/०५/२०२२ (या कार्यालयास प्राप्त दि ३०/०५/२०२२)

जाक्र.जिपजा/पं.-४/गौणख/कावि/२०२२ /2357
कार्यालय जिल्हा परिषद जालना
दिनांक :04/07/२०२२

**प्रशासकीय मान्यता आदेश**
**गौण खनिज सन २०२०-२१**

वाळू घाट लिलाव सन २०२०-२१ मध्ये ग्रामसभेची शिफारस असलेल्या ग्रामपंचायतीस निधी वितरीत करणे बाबत संदर्भ क्र १ अन्वये सूचित केले होते.संदर्भ क्र २ अन्वये शिफारसी करण्यात आलेल्या ग्रामपंचायतीचे प्रस्ताव सादर करणे बाबत गट विकास अधिकारी पंचायत समिती यांना कळविण्यात आले असून संदर्भ क्र ३ व ४ नुसार सदरचे प्रस्ताव प्राप्त करून मा.जिल्हाधिकारी जालना यांना सादर करण्यात आले असून संदर्भ क्र ५ अन्वये मा.जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली दि ०४/०५/२०२२ रोजी बैठक आयोजि करण्यात आली होती.बैठकिच्या इतिवृत्तांतनुसार २,९७,८७,४७२/- (अक्षरी रू दोन कोटी सत्यान्नव लक्ष सत्यांशी हजार चारशे बहात्तर रूपये मात्र) च्या कामांना मुख्य कार्यकारी अधिकारी ,जिल्हा परिषद जालना मला प्राप्त अधिकारा नुसार व जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ चे कलम १२५ नुसार खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून तसेच संदर्भ क्र ५ अन्वये मान्यतेनुसार आदेशात नमूद खालील कामांना प्रशासकीय मान्यता प्रदान करणे बाबतचा तपशिल खालीलप्रमाणे

| अ.क्र | तालुका | गावाचे नाव | सादर करण्यात आलेल्या प्रस्तावीतील कामाचा तपशील | मागणी रक्कम | मंजूर करण्यात येणा-या कामाचा तपशिल | मंजूर करण्यात येणारी रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | मंठा | वझर सरकटे | वझर सरकटे जि.प.शाळा खोली बांधकाम करणे | ७९९७०८ | वझर सरकटे जि.प.शाळा खोली बांधकाम करणे | ७९९७०८ |
| | | | वझर सरकटे जि.प.शाळा येथे शौचालय व मुता-या बांधकाम करणे | ५०५६९७ | वझर सरकटे जि.प.शाळा येथे शौचालय व मुता-या बांधकाम करणे | ५०५६९७ |
| | | | वझर सरकटे येथे पाण्याची टाकी बांधकाम करणे | ८०७८६४ | वझर सरकटे येथे पाण्याची टाकी बांधकाम करणे | ८०७८६४ |
| २. | मंठा | टाकळखोपा | सार्वजनिक पाणीपुरवठा करणे | १०००००० | सार्वजनिक पाणीपुरवठा करणे | १०००००० |
| | | | जि.प.शाळा खोलीची दुरूस्ती करणे | २४९९९८ | जि.प.शाळा खोलीची दुरूस्ती करणे | २४९९९८ |
| ३. | मंठा | दुधा-१ | जि.प.शाळेच्या खोलीची दुरूस्ती करणे | ८८२००० | जि.प.शाळेच्या खोलीची दुरूस्ती करणे | ८८२००० |
| | | | अंगणवाडी खोलीची दुरूस्ती करणे | ३६८००० | अंगणवाडी खोलीची दुरूस्ती करणे | ३६८००० |
| ४. | मंठा | कानडी १व २ | पाणी पुरवठा विहीर करणे | १२९६४०० | पाणी पुरवठा विहीर करणे | १२९६४०० |
| | | | वाटर फिल्टर बसविणे | ६००००० | वाटर फिल्टर बसविणे | ६००००० |
| | | | पुर्णा विहीर ते गाव व दलीत वस्ती पाईप लाईन करणे व इतर साहीत्य | १२४८००० | पुर्णा विहीर ते गाव व दलीत वस्ती पाईप लाईन करणे व इतर साहीत्य | १२४८००० |
| | | | जि.प.शाळा रूम करणे व इतर दुरूस्ती | ८५०००० | जि.प.शाळा रूम करणे व इतर दुरूस्ती | ८५०००० |
| ५. | मंठा | लिंबखेडा -१ | अंगणवाडी दुरूस्ती करणे | ३७८५१९ | अंगणवाडी दुरूस्ती करणे | ३७८५१९ |
| | | | जि.प.शाळा क्र १,२,३ व ४ दुरूस्ती करणे | ६२३१९० | जि.प.शाळा क्र १,२,३ व ४ दुरूस्ती करणे | ६२३१९० |
| | | | पाणी पुरवठा योजना दुरूस्ती करणे | ९९९००० | पाणी पुरवठा योजना दुरूस्ती करणे | ९९९००० |
| ६ | मंठा | देवठाणा-२ | जि.प.शाळा खोली क्र १ ते ४ ची दुरूस्ती करणे | ७९१००० | जि.प.शाळा खोली क्र १ ते ४ ची दुरूस्ती करणे | ७९१००० |
| | | | शाळेस वॉल कंपाउड करणे | ३९६००० | शाळेस वॉल कंपाउड करणे | ३९६००० |
| ७ | मंठा | भूवन | मौ.भूवन येथे जि.प.शाळा वॉल कंपाउड बांधकाम करणे | १२५०००० | मो.भूवन येथे जि.प.शाळा वॉल कंपाउड बांधकाम करणे | १२५०००० |
| ८ | भोकरदन | मेरखेडा | नळ पाणी पुरवठा योजना वितरण व्यवस्था व नळ जोडणी करणे | ८३७६०० | नळ पाणी पुरवठा योजना वितरण व्यवस्था व नळ जोडणी करणे | ८३७६०० |
| ९ | जाफ्राबाद | डावरगांवदेवी | जि.प.शाळा खोली बांधकाम | ८००००० | जि.प.शाळा खोली बांधकाम | ८००००० |
| १० | मंठा | इंचा-१ | पाणी पुरवठा करणे | ११८८९०० | पाणी पुरवठा करणे | ११८८९०० |
| | | | पाईप लाईन व पंपाचे काम | ७५०००० | पाईप लाईन व पंपाचे काम | ७५०००० |
| | | | ग्रामपंचायत कार्यालय दुरूस्ती करणे | ७५०००० | ग्रामपंचायत कार्यालय दुरूस्ती करणे | ७५०००० |
| ११ | मंठा | सासखेडा -१ | जि.प.शाळेला संरक्षण भिंत करणे | ९३१००० | जि.प.शाळेला संरक्षण भिंत करणे | ९३१००० |
| | | | अंगणवाडी इमारतीस संरक्षण भिंत करणे | ७६०००० | अंगणवाडी इमारतीस संरक्षण भिंत करणे | ७६०००० |

Scanned with CamScanner

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १२ | मंठा | देवठाणा-३ | ग्रामपंचायत कार्यालय दुरूस्ती करणे | ३१८००० | ग्रामपंचायत कार्यालय दुरूस्ती करणे | ३१८००० |
| | | | पाण्याच्या टाकीचे बांधकाम करणे | ४६०३०० | पाण्याच्या टाकीचे बांधकाम करणे | ४६०३०० |
| | | | जि.प.शाळेच्या खोलींची दुरूस्ती करणे खोली क्र ५,६व ७ | ५३५००० | जि.प.शाळेच्या खोलींची दुरूस्ती करणे खोली क्र ५,६व ७ | ४४१८२५ |
| १३ | जाफ्राबाद | गारखेडा | नविन पाईप लाईन करणे | १०९९९०० | नविन पाईप लाईन करणे . | १०९९९०० |
| | | | नाली सिमेंट पाईप टाकणे | १४७५०० | नाली सिमेंट पाईप टाकणे | १४७५०० |
| | | | जि.प शाळेसमोर गट्टू बसविणे | १६१२५५ | जि.प शाळेसमोर गट्टू बसविणे | १६१२५५ |
| १४ | बदनापूर | कुंभारी | जि.प.शाळा खोली व अंगणवाडी दुरूस्मी करणे | १०००००० | जि.प.शाळा खोली व अंगणवाडी दुरूस्मी करणे | १०००००० |
| | | | वॉटर फिल्टर बसविणे | १०९८६६७ | वॉटर फिल्टर बसविणे | १०९८६६७ |
| १५ | घनसांवगी | भादली | जि.प शाळा एका खोलीचे बांधकाम करणे | ८९८८११ | जि.प शाळा एका खोलीचे बांधकाम करणे | ८९८८११ |
| | | | पाणी पुरवठा योजना दुरूस्ती करणे | ३००००० | पाणी पुरवठा योजना दुरूस्ती करणे | ३००००० |
| | | | आनंद नगर वस्ती करिता अंतर्गत पाईप लाईन दुरूस्ती करणे | ३००००० | आनंद नगर वस्ती करिता अंतर्गत पाईप लाईन दुरूस्ती करणे | ३००००० |
| | | | अंगणवाडी क्र ३ दुरूस्ती करणे | ३९९६१८ | अंगणवाडी क्र ३ दुरूस्ती करणे | ३९९६१८ |
| १६ | मंठा | उस्वद | स्मशान भूमी क्र १ ला कंपाउड वॉल करणे | १२९९०७४ | स्मशान भूमी क्र १ ला कंपाउड वॉल करणे | १२९९०७४ |
| | | | स्मशान भूमी क्र २ ला कंपाउड वॉल करणे | १२९९८४४ | स्मशान भूमी क्र २ ला कंपाउड वॉल करणे | १२९९८४४ |
| | | | स्मशान भूमी सुशोभिकरण करणे | ११५०००० | स्मशान भूमी सुशोभिकरण करणे | ११५०००० |
| १७ | जाफ्राबाद | गारखेडा | जि.प.शाळेसमोर पेव्हर ब्लॉक बसविणे | ३४९८०२ | जि.प.शाळेसमोर पेव्हर ब्लॉक बसविणे | ३४९८०२ |
| | | | | | | २९७८७४७२ |

**अटी व शर्ती खालील प्रमाणे**

०१. कामांचे सविस्तर अंदाजपत्रक व नकाशे स्थानिक स्तरावर तयार करुन सक्षम अधिकाऱ्याकडून मान्यता घेणे बंधनकारक आहे.

०२. कामास तांत्रिक मान्यता देण्यापुर्वी देखभाल दुरुस्तीचे प्रमाणपत्र/जागा उपलब्ध असल्याचे प्रमाणपत्र व नियोजित कामाचे ठिकाणी यापुर्वी कोणत्याही योजनेतुन काम न झाल्याचे प्रमाणपत्र असल्याची खात्री करुनच तांत्रिक मान्यता प्रदान करावी. तसेच सदर मंजुरी तांत्रिक मान्यतेच्या अधिन राहुन देण्यात येत आहे.

०३. प्रशासकीय मान्यता रक्कमेच्या मार्यादेतच खर्च करणे बंधनकारक राहील. जास्तीचा येणारा खर्च ग्रा.पं.तीस खर्च करावा लागेल.

०४. कामावरील गुण नियंत्रणाचे सनियंत्रण स्थानिकस्तर/जिल्हास्तर/राज्यस्तर वरुन करण्यात येईल.

०५. ग.वि.अ.मार्फत उपयोगिता प्रमाणपत्र मुख्य कार्यकारी अधिकारी यांना सादर करणे बंधनकारक आहे

०६. महा.जि.प. व पं.स. लेखासंहिता १९६८ चे नियम १६८ नुसार उप अभियंता व कार्यकारी अभियंता यांची कामाच्या प्रत्येक टप्प्यावर तपासणी शिवाय देयकाबाबतची अदाई केली जाणार नाही.

०७. शासन निर्णय ३/५/२०११ नुसार साहित्य खेरेदीची प्रक्रिया नियमाप्रमाणे करावी याबाबत ग.वि.अ.यांनी नियंत्रण ठेवावे. काही अनियमितता झाल्यास संबंधित ग्रा.पं. व ग.वि.अ.हे जबाबदार राहतील.

०८. कामे पुर्ण झाल्यावर देखभाल दुरुस्ती ग्रामपंचायतीने करणे अनिवार्य/बंधनकारक आहे.

०९. रस्ते व नाली टिकाऊ व्हावेत म्हणुन प्रधानमंत्री / मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेच्या धर्तीवर नियोजन संकल्पन व अमलबजावणी उपअभियंता बांधकाम यांनी करणे आवश्यक आहे.

१०. तांत्रिक मंजुरी, निविदा काढणे स्विकारणे इत्यादी बाबींची कार्यवाही सक्षम प्राधिकाऱ्याकडून करून घेण्याची जबाबदारी ग.वि.अ./बांधकाम विभाग यांची राहील.

११. अतिक्रमण काढण्याची जबाबदारी संबंधित ग्रामपंचायतची राहील.

१२. कामे ग्रामपंचायती मार्फतच करण्यात यावे, ग्रामपंचायतीच्या मर्यादे बाहेरिल कामे जिल्हा परिषदेच्या प्रचलीत नियमा प्रमाणे करण्यात यावे.

१३. रस्त्याची धावपट्टी ३.७५ मी. रुंदीमध्ये घेऊन आवश्यकता असल्यास जीएसबी थर व खडीच्या थराचा विचार करण्यात यावा.

१४. पाण्याचा निचरा योग्य होईल याची दक्षता घ्यावी. आवश्यक ठिकाणी पुल/छोटया मोऱ्या घेता येतील. पाईपलाईन किंवा केबल इत्यादी क्रॉसींगसाठी विशेष तरतुद करण्यात यावी.

१५. ज्या कामाची प्रशासकीय मान्यता आहे तेच काम करण्यात यावे. कामात बदल करण्यास ग.वि.अ. किंवा ग्रा.पं.तीस अधिकार नाही. असे केल्यास कामात अनियमितता झाल्याचा ठपका ठेवण्यात येईल.

१६. कामे सुरु होण्यापुर्वी व पुर्ण झाल्यावर छायाचित्र घेणे बंधन कारक राहील. छायांचित्र नसल्यास देयकाची अदाई करण्यात येणार नाही.

१७. कामे विहीत मुदतीत पुर्ण करण्यात यावी.

१८. या योजनांतर्गत होणाऱ्या खर्चाचा हिशोब विहित नियम/पध्दतीनुसार ठेवण्यात यावा.

१९. शासकीय जमीनीवर करावयाच्या बांधकामाबाबत सक्षम अधिकारी यांची परवानगी घेणे, तसेच खाजगी जागा असल्यास जागेचे दानपत्र नियमानुसार रजिस्ट्रर करुन कामास सुरुवात करणे बंधनकारक आहे.जागेबाबत काही वाद निर्माण झाल्यास त्यांची संपूर्ण जबाबदारी कार्यान्वयीन यंत्रणांची राहील.

२०. सदर मंजुर कामावरील निधी हा अखर्चीत राहाणार नाही याची दक्षता संबधित कार्यान्वयीन यंत्रणेनी घ्यावयाची आहे.

२१. काम हाती घेण्यापुर्वी संबंधित क्षेत्रात जि.प., पं.स. व ग्रा.पं.सार्वत्रिक निवडणूका/पोट निवडणूकांसाठी आचारसंहिता अंमलात असेल तर कामे सुरु करण्यात येवू नये व इतर बाबतीत आचारसंहिताचे पालन करावे.

२२. कामाच्या ठिकाणी पुढील प्रमाणे नामफलक लावणे बंधनकारक राहील. नामफलक नसेल तर देयकातून रू.३०००/- ची कपात करण्यात येईल.

२४. सदरील कामाचा प्रगती अहवालासंबंधी आढावा दरमहा होणाऱ्या तालुकास्तरीय बैठकित उपअभियंता (ग्रा.प.पू व बांधकाम), शाखा अभियंता, वि.अ.(पं), ग्रामविकास अधिकारी / ग्रामसेवक यांच्या बैठकीत घेण्यात येवून मासिक अहवाल दरमहा या कार्यालयास सादर करण्याची जबाबदारी पं.सं.बांधकाम विभाग / उपअभियंता (बां) यांची राहिल.

२५. अदांजपत्रकीय रक्कमेच्या १ % रक्कम ही स्टेट कॉलीटी मॉनेटेरिंग साठी ठेवण्यात यावा.

Scanned with CamScanner

| १२ | मंठा | देवठाणा-३ | ग्रामपंचायत कार्यालय दुरूस्ती करणे | ३१८००० | ग्रामपंचायत |
|---|---|---|---|---|---|

२६. देयका सोबत मुल्यांकण प्रमाणपत्र, अनुदान मागणीपत्र, छायाचित्र, कामाचा गुणवत्ता अहवाल, उपयोगिता प्रमाणपत्र व काम पुर्णत्वाचे प्रमाणपत्र इ. ग.वि.अ. यांचे मार्फत सादर करणे बंधनकारक राहिल.
२७.प्रस्तावित कामे यापुर्वी इतर कोणत्याही योजनेतुन झाली नसल्याची वा प्रस्तावित नसल्याची खात्री करावी.
२८. प्रस्तावित कामासाठी पुरेसा वाव (Scop) असल्याची खात्री करावी.
२९.मंजूर कामाचे बाबतीत वित्तीय नियमांचे पालन करण्याची जबाबदारी संबंधित ग्रामपंचायतीची राहील.
३०.मंजूर रकमेच्या ५०% एवढा निधी मा.जिल्हाधिकारी यांचे मार्फत थेट ग्रामपंचायतीला पहील्या टप्यात वर्ग करण्यात येईल).
३१.उर्वरीत ५०% रककम काम पुर्ण झाल्याचे प्रमाणपत्र (जिओ टॅगींगच्या फोटो सह प्रमाणपत्र) कामाची गुणवत्ता समाधानकारक असल्याचे प्रमाणपत्रासह सादर केल्यानंतर विरीरीत करण्यात येईल.

(मनुज जिंदल, भा.प्र.से )
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद,जालना

प्रतिलीपी
१.मा.विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांना सविनय माहीतीस्तव .
२.मा.जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय जालना यांना सविनय माहीतीस्तव.
३.अप्पर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय जालना यांना सविनय माहीतीस्तव.
४.जिल्हा खनिकर्म अधिकारी ,जालना यांना माहीतीस्तव तथा आवश्यक त्या कार्यवाहीस्तव.
५.गट विकास अधिकारी पंचायत समिती ------------------------यांना तथा आवश्यक त्या कार्यवाहीस्तव.
६. उप अभियंता, शाखा/कनिष्ठ अभियंता, जि.प.उपविभाग(बांध)/पं.स. -------------यांना अंदाजपत्रकानुसार कामे करुन घेणेसाठी कार्यवाहीस्तव.
७. ग्रा.वि.अ./ ग्रामसेवक, ग्रा.पं.कार्यालय, ----------------- कार्यवाहीस्तव.

(मनुज जिंदल, भा.प्र.से )
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद,जालना

Scanned with CamScanner